**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळे देशातल्या नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- वितरकांकडे रांग लावण्याऐवजी ऑनलाइन पद्धतीने सिलिंडर नोंदणीचे पेट्रोलियम मंत्रालयाचे आवाहन

- आखाती देशातल्या युद्धामुळं महाग होत असलेल्या विमान इंधनाचा अतिरीक्त भार प्रवाशांवर टाकण्याचा विमान कंपन्यांचा निर्णय

**आणि**

- मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी उद्या मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा, मुंबई महानगर क्षेत्रात उष्णतेची लाट येणार

**<><><><><>**

पश्चिम आशियाई देशातल्या युद्धामुळे देशातल्या नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विरोधी पक्ष मात्र बेजबाबदारीनं वागून देशात गोंधळाचं वातावरण पसरवत असल्याची टीका त्यांनी केली. ते आज आसाममध्ये सिलचर जिल्ह्यातल्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण केल्यावर बोलत होते.

- **- - होल्ड- प्रधानमंत्री बाइट - - -**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा पहिला हप्ता आपण काल आसाममध्ये वितरित केला असं मोदी यांनी सांगितलं. रालोआ सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री मोदी यांनी केला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शेतीचं आधुनिकीकरण यांना सर्वोच्च प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

एलपीजी वितरकांकडे सिलिंडरचा साठा उपलब्ध असून ग्राहकांनी गरज असेल तरच सिलिंडर मागवावा. सिलिंडरचं नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करावं, वितरकांच्या दुकानांबाहेर

रांगा लावू नयेत, असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी आज केलं.

**- - होल्ड... बाईट - सुजाता शर्मा - - -**

राज्य सरकारांकडे व्यावसायिक सिलिंडर उपलब्ध असून आता २९ राज्यं तसंच केंद्र शासित प्रदेशांमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरचं वितरण सुरू झालं आहे, असं शर्मा म्हणाल्या. सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजीचा बिमोड करण्यासाठी महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश अशा राज्यांमध्ये राज्य सरकारांकडून छापे टाकले जात आहेत, अशी माहितीही शर्मा यांनी दिली.

भारताचा ध्वज असलेल्या शिवालिक आणि नंदा देवी या दोन जहाजांनी होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे ओलांडली असल्याची माहिती बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी दिली आहे. या जहाजांवर ९२ हजार ७०० मेट्रिक टन एलपीजी गॅस आहे. ही जहाजं येत्या १६ आणि १७ मार्च रोजी मुंद्रा आणि कांडला बंदरात पोहोचतील असं सिन्हा म्हणाले.

२८ फेब्रुवारीपासून आजपर्यंत १ लाख ७२ हजार भारतीय नागरिक पश्चिम आशियातून भारतात परतले आहेत, अशी माहिती आखाती राष्ट्रांसाठीचे परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव असीम महाजन यांनी दिली. देशातल्या विविध विमानतळांवरून उड्डाणांची संख्या वाढवण्यात आल्यामुळे हवाई संपर्कात सातत्याने सुधारणा होत आहे. भारतात थेट उड्डाणं उपलब्ध नसलेल्या बहरीन, कुवैत आणि इराकमधल्या भारतीय नागरिकांसाठी सौदी अरेबियामार्गे पुढच्या प्रवासासाठी व्हिसा सुविधा उपलब्ध करून दिली जात असल्याचं महाजन म्हणाले. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सहसचिव सी. सेंथिल राजन यांनी समाज माध्यमावर प्रसारित केल्या जाणाऱ्या बनावट बातम्यांपासून सावध राहण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

नागरिकांना घरगुती स्वयंपाकाच्या गॅसचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी प्रशासनानं पावलं उचलली असून गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या वितरणात कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा गैरव्यवहार झाल्यास गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा रत्नागिरीचे पालकमंत्री

डॉ. उदय सामंत यांनी आज घेतलेल्या गॅस कंपनी, वितरक आणि हॉटेल व्यवसायिकांच्या आढावा बेठकीत दिला.

**नाशिक**मध्ये सिलेंडर बुक झाल्यानंतर ते दोन ते तीन दिवसात देण्यात येईल त्यामुळे लोकांना वितरकांकडे अनावश्यक गर्दी करु नये असं आवाहन प्रशासनानं केलं.

गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी **लातूर** जिल्हा प्रशासनानं दहा भरारी पथकं तैनात केली आहेत.

घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या संशयावरुन आज **भंडारा** जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे हॉटेल आणि खानावळींवर धाडी टाकण्यात आल्या. एकूण तीन ठिकाणी झालेल्या कारवाईत ८ सिलेंडर जप्त करण्यात आली.

**बीड** शहरातील शिवनेरी नगर परिसरात एका घरात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचा अवैध साठा केल्याप्रकरणी एकावर गुन्हा नोंदवण्यात आला असून हा साठा जप्त करण्यात आला आहे.

गॅस सिलिंडरच्या मुद्द्यावरुन **भंडारा** जिल्हा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निर्दशनं केलं.

**<><><><><>**

आखाती देशातल्या युद्धामुळं महाग होत असलेल्या विमान इंधनाचा भार प्रवाशांवर टाकण्याचा निर्णय देशातल्या विमान कंपन्यांनी घेतलेला आहे. इंडिगो कंपनीनं आजपासून ही आकारणी सुरू केली आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करताना विमान प्रवाशांना सव्वा चारशे ते तेवीसशे रुपये अतिरीक्त मोजावे लागतील. अकासा एअरच्या प्रवाशांना उद्यापासून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करताना दोनशे ते तेराशे रुपये अतिरीक्त द्यावे लागतील. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसनं १० तारखेपासून इंधन अधिभार वसूल करणं सुरू केलं आहे.

**<><><><><>**

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा फटका पूर्व विदर्भातल्या राईस मिलना बसला आहे. गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर या पाच जिल्ह्यांमध्ये अकराशेपेक्षा जास्त राईस मिल आहेत. युद्धामुळे आखाती देशांमध्ये होणारी तांदळाची निर्यात गेल्या पंधरा दिवसांपासून ठप्प झाल्या आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला

आहे. बाजारपेठेत तांदळाचे दर कोसळल्यामुळे आणि खरेदीदार नसल्यामुळे तांदूळ व्यापाऱ्यांचंही नुकसान झालं आहे.

<><><><>

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने येत्या १ एप्रिलपासून 'फास्टॅग' वार्षिक पासचे दर अडीच टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तीन हजार रुपयांत मिळणारा हा वार्षिक पास आता ३ हजार ७५ रूपयांना मिळणार आहे.

<><><><>

राज्यात आज ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबवण्यात आलं. महसूल, आरोग्य, पुरवठा, महिला आणि बालविकास, ग्रामविकास आणि पंचायतराज, शिक्षण, कृषी, वनविभाग, भूमी अभिलेख, आदी विभागांच्या माध्यमातून विविध सेवा देण्यात आल्या.

बुलढाणा जिल्ह्यात लोणार तालुक्यात हिरडव इथं, कर्जत तालुक्यात भांबोरा इथं सिद्धेश्वर मंदिर परिसरात, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ला इथं तसंच अहिल्यानगर, जालना, यवतमाळ इथेही या शिबिरांचं आयोजन केल्याची माहिती आमच्या बातमीदारांनी दिली आहे.

<><><><>

मुंबई महानगर परिसरातल्या नामांकित खासगी रुग्णालयांनी राज्य शासनाच्या एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत सक्रिय सहभाग घ्यावा असं आवाहन सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. ते आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत बोलत होते.

<><><><>

केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातली वनराणी या रेल्वेगाडीचं लोकार्पण केलं. ही रेल्वे आता बॅटरीवर आधूनिक रुपात धावणार आहे.

<><><><>

चंद्रपूर इथल्या न्यू एरा क्लीनटेक कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या ग्रीनफिल्ड कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पाचं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिपूजन केलं. या प्रकल्पात कोळशावर प्रक्रिया करुन विविध रसायनं तयार केली जाणार आहेत.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातून अयोध्याला निघालेल्या खाजगी बसला उत्तर प्रदेशातल्या कानपूरजवळ आज पहाटे अपघात होऊन एक महिला भाविक मृत्युमुखी पडली. दुर्घटनेत वाहनचालक गंभीर जखमी झाला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार आहे. सकाळी साडेआठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. सायंकाळी 6 ते 7 वाजेपर्यंत निकाल लागण्याची शक्यता आहे. परिवर्तन उत्कर्ष आघाडी आणि साहित्य संवर्धन आघाडी अशा दोन आघाड्यांमध्ये चुरस आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याकाळात रत्नागिरी, धुळे, नंदूरबार, जळगाव आणि नाशिकमध्येही वातावरण उष्ण राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

दरम्यान, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिकचा घाटमाथा इथं हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची तर कोल्हापूर, सातारा, सांगली, बीड आणि परभणीत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**